असा. क्र. १२०

रजिस्टर्ड नं. टीईसीएच/४७-३०३/एमबीआय/२००३-०५

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

**सोमवार, जून ७, २००४/ज्येष्ठ १७, शके १९२६**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग चार-ब

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### ग्रामविकास व जलसंधारण विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ७ जून २००४

**अधिसूचना**

**मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८.**

क्रमांक व्हीपीएम. २६०१/प्र.क्र. १६७३/२२.—मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ (सन १९५९ चा मुंबई अधिनियम ३) च्या कलम १७६ चा पोट-कलम (२) चा खंड (सव्वीस) अन्वये महाराष्ट्र शासनास प्रदान करण्यात आलेल्या व त्याबाबतीत महाराष्ट्र शासनास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन याद्वारे, महाराष्ट्र ग्रामपंचायत कर व फी नियम, १९६० यात आणखी सुधारणा करण्यासाठी पुढील नियम करीत आहे, हे नियम उक्त कलम १७६ चे पोट-कलम (४) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे यापूर्वी प्रसिद्ध करण्यात आले आहेत :—

१. या नियमांना महाराष्ट्र ग्रापंचायत कर व फी (सुधारणा) नियम, २००४ असे संबोधण्यात येईल.



[ किंमत : ३.०० रुपये ]

Scanned by CamScanner

२. महाराष्ट्र ग्रामपंचायत कर व फी नियम, १९६० च्या भाग दोन मधील अनुसूचीतील "दोन : जमिनीवरील कराचा दर" या शीर्षकाच्या कोष्टकाखालील अनुक्रमांक १ समोरील रकाना क्रमांक ३ मध्ये (किमान) या शब्दाखालील "५" या अंकाऐवजी "निरंक" हा शब्द व (कमाल) या शब्दाखालील "१०" या अंकाऐवजी "निरंक" हा शब्द दाखल करण्यात यावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

कुंदा गोसावी,
शासनाच्या उप सचिव.

Scanned by CamScanner

## RURAL DEVELOPMENT AND WATER CONSERVATION DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 7th June 2004

*NOTIFICATION*

BOMBAY VILLAGE PANCHAYATS ACT, 1958.

No. VPM. 2601/CR-1673/22.—In exercise of the powers conferred by clause *(xxvi)* of sub-section *(2)* of section 176 of the Bombay Village Panchayats Act, 1958 (Bom. III of 1959) and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby makes the following rules further to amend the Maharashtra Village Panchayats Taxes and Fees Rules, 1960, the same having been previously published as required by sub-section *(4)* of the said section 176, namely :—

1. These rules may be called the Maharashtra Village Panchayats Taxes and Fees (Amendment) Rules, 2004.

2. In Part II of the Maharashtra Village Panchayats Taxes and Fees Rules, 1960, in the Schedule, below table with heading " II Rate of tax on lands ", against Serial No. 1 in column (3) for the figure " 5 " the letters " NIL " and for the figure " 10 " the letter " NIL " shall be substituted.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

KUNDA GOSAVI,
Deputy Secretary to Government.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

Scanned by CamScanner